# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
## आरोग्य विभाग

आरोग्य / कार्या.क्रं.१ / जा.क्रं./ ८३ /२०१४ दिनांक :- ४ / ६ /२०१४

## जाहिर निविदा सुचना

जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या जनावरांचा कोंडवाडा असून तो ५ वर्ष कालावधी करीता संस्थेस मिळणाऱ्या रक्कमेतून म.न.पा.स २०% पेक्षा जास्तीत जास्त स्वामित्व शुल्क देणाऱ्या संस्थेस देखभालीसाठी दयावयाचे आहे. तरी असे देखभालीचे काम करणाऱ्या खाजगी नोंदणीकृत गोरक्षण संस्था इच्छुक असल्यास दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे स्वरुप, त्या अनुषंगीक माहिती नुसार व निविदा अटी व शर्ती इ. बाबत आरोग्याधिकारी, ८ वा मजला यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध आहे. तसेच जळगांव शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर उपलब्ध आहे.

उपायुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## निविदा फॉर्म

## आरोग्य विभाग

निविदा फॉर्म क्रमांक -------------

कामाचे नांव :- जळगांव शहर महानगरपालिकेचा कोंडवाडा खाजगी नोंदणीकृत गोरक्षण संस्थेस देखभालसाठी देणे बाबत.

उपायुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

Ok



F:\My File\Kondwada Nivida File.doc

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तपशील | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | दि. / /२०१४ रोजीची जाहिर सुचना | :- | ०३ |
| २) | कामाचे स्वरुप | :- | ०४ |
| ३) | पात्रते बाबतचे दस्ताऐवज ( लिफाफा क्रं. १ ) | :- | ०५ - ०६ |
| ४) | कोंडवाडा देखभालीचा निविदा प्रस्तावाप्रमाणे पृष्ठ क्र. ७ मधील अनुक्रमांक २ ला अनुसरुन करावयाचे प्रतिज्ञापत्र | :- | ०७ |
| ५) | निविदा प्रस्तावाचे विशेष अटी शर्ती व सर्व साधारण अटी शर्ती | :- | ०८ - ११ |
| ६) | लिफाफा क्रं. २ ( आर्थिक लिफाफा ) | :- | १२ |
| ७) | परिशिष्ट "अ" | :- | १३ |
| ८) | परिशिष्ट "ब" | :- | १४ |
| ९) | परिशिष्ट "क" | :- | १५ |
| १०) | परिशिष्ट "ड" | :- | १६ |

## जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
### आरोग्य विभाग

आरोग्य / कार्या.क्रं.१ / जा.क्रं./ /२०१४ दिनांक :- ४ / ६ /२०१४

# जाहिर निविदा सुचना

जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या जनावरांचा कोंडवाडा असून तो ५ वर्ष कालावधी करीता संस्थेस मिळणाऱ्या रक्कमेतून म.न.पा.स २०% पेक्षा जास्तीत जास्त स्वामित्व शुल्क देवून देखभालीसाठी दयावयाचे आहे. तरी असे देखभालीचे काम करणाऱ्या खाजगी नोंदणीकृत गोरक्षण संस्था इच्छुक असल्यास दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे.

सदर कामाचे स्वरुप, त्या अनुषंगीक माहिती नुसार व निविदा अटी व शर्ती इ. बाबत माहिती आरोग्याधिकारी, ८ वा मजला यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास उपलब्ध आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | **कामाचे स्वरुप** | :- | जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या जनावरांचा कोंडवाडा असून तो ५ वर्ष कालावधी करीता संस्थेस मिळणाऱ्या रक्कमेतून म.न.पा.स २०% पेक्षा जास्तीत जास्त स्वामित्व शुल्क देवून देखभालीसाठी दयावयाचे आहे. |
| २) | **कामाचा कालावधी** | :- | कार्यादेशापासून ५ वर्ष |
| ३) | **निविदा फॉर्मची किमंत** | :- | रु.५००/- (ना परतावा) |
| ४) | **निविदा विक्री दिनांक व वेळ** | :- | दि. ५ / ६ /२०१४ ते दि. २३ / ६ /२०१४ पर्यंत वेळ ४.०० वाजे पर्यंत. |
| ५) | **निविदा इसारा रक्कम** | :- | रु.२०,०००/- रोखीने दि. १६/ ६ /२०१४ ते दि. १७/ ६ /२०१४ रोजी ४.०० वाजे पावेतो. |
| ६) | **सिलबंद निविदा स्विकृती** | :- | दि. १८/ ६ /२०१४ वेळ - दुपारी ४.०० वाजे पर्यंत.<br>**स्थळ** - प्रशासकिय इमारत,८ वा मजला,आरोग्य विभाग |
| ७) | **सिलबंद निविदा उघडणे** | :- | दि. १८/ ६ /२०१४ रोजी शक्य झाल्यास दु.४.३० वाजता.<br>**स्थळ** - प्रशासकीय इमारत, १३ वा मजला उपायुक्त (आरोग्य) यांचे कार्यालय |

**उपायुक्त,**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

...३...

F:\My File\Kondwada Nivida File.doc

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
## कामाचे स्वरुप

जळगांव शहर महानगरपालिका मालकीचा जनावरांचा कोंडवाडा खाजगी नोंदणीकृत गोरक्षण संस्थेस देखभालीसाठी देणे.

१. संस्थेचे कर्मचाऱ्यांनी शहरातील विविध भागात जाऊन मोकाट जनावरांना पकडून कोंडवाडयात टाकणे.

२. कोंडवाडयात टाकलेल्या जनावरांची देखभाल, चारापाणी, लाईट, स्वच्छता व आवश्यकतेनुसार औषधोपचार व्यवस्था करणे.

३. स्वामित्व शुल्क दरमहा म.न.पा. खजिन्यात जमा करावे लागेल.

# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## आरोग्य विभाग

## पात्रतेसंबंधीचे निकष (दस्ताऐवज ) ( लिफाफा क्रं. १ )

## मक्तेदाराने, संस्थांनी खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक राहील.

१. धर्मदाय आयुक्त यांचे कडील नोंदणीकृत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

२. जी व्यक्ती अज्ञान आहे किंवा जी व्यक्ती दिव्नाळखोर म्हणून जाहिर झालेली आहे किंवा भारतीय दंड विधान कायदयाअंतर्गत एखादया गुन्हयात न्यायालयाने दोषी जाहिर केलेली असेल किंवा अशा प्रकारच्या गुन्हया मध्ये ती व्यक्ती नैतीक मुल्य भ्रष्टं करण्याकामी समाविष्ट असेल किंवा जी व्यक्ती जर गुन्हेगारी स्वरुपाच्या कामात समाविष्ट असेल किंवा काही काळा पुरती प्रतिबंधक कायदया खाली स्थानबंध्द केलेली असेल किंवा केंद्र शासन, राज्य शासन, किंवा महानगरपालिका यांची त्या व्यक्तीस / संस्थेस काळया यादीत टाकलेली असेल अशी व्यक्ती / संस्था निविदा भरण्यास अपात्र समजण्यात यावी. अशा व्यक्तीने अथवा संस्थेने जर निविदा सादर केली तर ती रद्द समजण्यात येईल. निविदाकाराने निविदा कागदपत्रासोबत शपथपत्र पृष्ठ क्रं. ६ वरील मसूदा प्रमाणे रु.५००/- च्या मुद्रांक पेपरावर स्वतः सादर करणे अनिवार्य राहील.

३. मक्तेदार यांचे संस्था असल्यास नोंदणीचे प्रमाणपत्र व संस्थेचे पॅनकार्ड जोडणे आवश्यक राहिल.

४. निविदा इसारा रक्कम भरणा केल्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

**टिप** - मोहोरबंद निविदा प्रस्ताब सादर करतांना :-

१) लिफाफा क्रं. १ मध्ये मागणी केलेले पात्रतेबाबतचे दस्ताऐवज टाकुन मोहोरबंद करुन लिफाफ्यावर लिफाफा क्रं.१ (तांत्रिक लिफाफा ) असे लिहावे. व त्यावर कामाचे नांव नमुद करावे.

२) लिफाफा क्रं.२ मध्ये मनपा कडून पुरवठा केलेला निविदा प्रस्ताव संच लिफाफ्यात टाकून मोहोरबंद करुन लिफाफ्यावर लिफाफा क्रं. २ ( निविदा प्रस्ताव लिफाफा )असा स्पष्ट उल्लेख करावा.

...५...

३ ) लिफाफा क्रं.१ व लिफाफा क्रं.२ हे एका मोठया लिफाफ्यात टाकुन लिफाफ्यावर कामाचा उल्लेख करावा व मोहोरबंद करुन मुदतीत पेटीत टाकावे.

४ ) मुदतीनंतर आलेला अथवा पोष्टाद्वारे, कुरिअर एजन्सीद्वारे पाठविलेला निविदा प्रस्ताव कोणत्याही सबबीवर स्विकारला जाणार नाही.

५) प्रथमतः तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. व त्यात सर्व बाबींची पुर्तता झाल्याची खात्री केलेनंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

उपायुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
## आरोग्य विभाग
## निविदा पृष्ठ क्रं.५ मधील अनुक्रमांक २ ला अनुसरुन
## रक्कम रु.५००/- चे मुद्रांकपेपरवर करावयाचे
## प्रतिज्ञापत्र (मसूदा )

संदर्भ : १) -------------- दि. / / २०१४ दि. / /२०१४

मी / आम्ही -------------------------------------------वय --------------राहणार ------ ---------------------------------------------सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

१. मी / आम्ही / संस्थेने दिवाळखोरी जाहिर केलेली नाही. अथवा दिवाळखोर म्हणून घोषीत झालेली नाही.

२. मी / आम्ही / संस्थेने अनुचीत कामगार प्रथेचा अवलंब केलेला नाही.

३. मी / आम्ही / संस्थेने कोणतेही गैरकृत्य करुन नैतीक अध:पतनाने कोणतेही कृत्य आमचेकडून घडलेले नाही.

४. माझेकडून / आमचेकडून / संस्थेकडून कोणतेही गुन्हेगारी कृत्य घडलेले नाही. तसेच उक्त कृत्यांसाठी मी / आमच्या / संस्थे विरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा दाखल झालेला नाही.

५. मी / आम्ही / संस्थेने विरोधात आयकर / विक्रीवर व फेरा इ. कायदयांचे उल्लंघन केलेले नाही. त्याबाबत माझ्या / आमच्या / संस्थेच्या विरुध्द खटला किंवा दावा दाखल झालेला नाही.

६. मला / आम्हाला / संस्थेला, शासकिय / स्थानिक संस्था किंवा न.पा./म.न.पा. या कार्यालयाने काळया यादीत टाकलेले नाही.

७. मला / आम्हाला कामाचे स्वरुप व व्याप्ती मध्ये दिल्याप्रमाणे तसेच करारनामा अटी शर्ती प्रमाणे कामाचा / मालपुरवठचा दर्जा चांगला नसल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव मक्ता रद्द केल्यास मी / आम्ही सदर ठिकाणी दुरुस्तीसाठी व इतर कामासाठी केलेल्या खर्चाची मागणी करणार नाही.

८. मी / आम्ही असे घोषीत करतो की, आमचे संस्थेचे / फर्मचे भागिदार म्हणून म.न.पा.चे नगरसेवक / अधिकारी / कर्मचारी इत्यादी समाविष्ट नाहीत.

९. पात्रते बाबतचे दाखल केलेले कागद पत्र सर्व खरे आहेत.

निविदाकाराची स्वाक्षरी :- ------------------------------------------------------------
निविदाधारकाचे संपुर्ण नांव :- ------------------------------------------------------------
निविदाधारकाचे संपुर्ण पत्ता :- ------------------------------------------------------------
निविदाधारकाचे फोन नंबर :- ------------------------------------------------------------
निविदाधारकाचे मोबाईल नंबर :- ------------------------------------------------------------
निविदाधारकाचा ईमेल आयडी :- ------------------------------------------------------------

...७...

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## निविदा सर्व साधारण अटी शर्ती

**अ ) कोंडवाडा देखभाली संबंधी सर्वसाधारण अटी शर्ती**

१. म.न.पा., संस्थेस कोंडवाडयाची जागा देईल.

२. कोंडवाडा देखभाल करण्यास दिल्यानंतर तो मुदतीच्या आंत संस्थेस बंद करता येणार नाही.

३. म.न.पा. कडून शहरातील कोणत्याही भागातील मोकाट जनावरांच्या तक्रारी बाबत पत्र किंवा अर्ज आल्यास संस्थेने पत्रानुसार कारवाई करणे बंधनकारक राहिल.

४. संस्था ५ वर्षानंतर कोंडवाडा म.न.पा.स हस्तांतरण करेल त्या वेळेस कोंडवाडा सुस्थितीत असणे आवश्यक राहिल.

५. कोंडवाडयात असलेल्या जनावरांसाठी चारा, पाणी यांची व्यवस्था संस्थेने करणे आवश्यक राहिल.

६. कोंडवाडयासाठी लागणारे लाईट कनेक्शन देण्यात येईल. त्याचे दरमहा देयक म.न.पा.स द्यावे लागेल.

७. कोंडवाडयामध्ये उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतूंमध्ये जनावरांना ऊन,वारा, पाऊस यांचा त्रास होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहिल.

८. संस्थेने नेमणूक केलेले कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणे आवश्यक राहिल. त्यावर "म.न.पा.चे कामासाठी" असे टाकणेस परवानगी देण्यात येईल.

९. कोंडवाडयात असलेली जनावरे आजारी पडल्यास त्यांना वैद्यकिय सुविधा संस्थेच्या खर्चाने देणे बंधनकारक राहिल.

१०. जनावरांची नोंदी घेणेसाठी म.न.पा. आरोग्य विभागाचे पौंडकिपर यांची नियुक्ती करण्यात येईल. सदर पौंडकीपर हे कोंडवाडयात येणारी जनावरांची व मालकांनी सोडविलेल्या जनावरांची नोंदी ठेवेल.

११. कोंडवाडयात असलेल्या जनावरांचा काही कारणास्तव अकस्मात मृत्यु झाल्यास त्याचा पंचनामा मनपा कर्मचारी (पौंडकिपर) यांचे कडून करुन संस्थेने सदर जनावराचे शव अधिकृत पशु वैद्यकिय चिकित्सकांकडून विच्छेदन करुन पुढील विल्हेवाटसाठी म.न.पा.स कळविणे बंधनकारक राहिल. त्यानंतर पंचनामा व अधिकृत शव विच्छेदन अहवाल पौंडकिपर यांचेकडेस द्यावा लागेल.

१२. संस्थेस जनावरांच्या मालकांकडून प्रशासकिय ठराव क्र.८ दि.१५/४/२००३ नुसार ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच जनावरांच्या मालकांकडून दंड, खावटी, सोडबांध फी जमा करावी लागेल. सदर जमा रकमेतून संस्थेस आलेला खर्च भागविता येईल. म.न.पा. या व्यतिरिक्त कोणताही वेगळा खर्च संस्थेस देणार नाही.

...८...

१३. संस्थेस म.न.पा.ने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे जनावरांच्या मालकांकडून दंडापोटी वसूल केलेल्या रक्कमेतून मोठया जनावरांसाठी रु.१०००/- व लहान जनावरांसाठीं रु.५००/- या मिळणाऱ्या दंडाचे रक्कमेतून २०% पेक्षा जास्तीत जास्त स्वामित्व शुल्क देणाऱ्या संस्थेची निविदा मंजूर करण्यात येईल. तसेच सदरचे स्वामित्व शुल्क दरमहा म.न.पा.त रोखीने भरावे लागेल.

**ब ) कामाची वेळ व पर्यवेक्षण**

१. शहरातील मोकाट जनावरे सकाळी ६.०० ते संध्याकाळी ६.०० पर्यंत संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून पकडून कोंडवाडयात टाकणे बंधनकारक राहिल.

२. संस्थेने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांनी काही गैरवर्तन केल्याचे निर्दशनास आल्यास व तसे महापालिकेने संस्थेस कळविल्यास त्यास तात्काळ कामावरुन कमी करुन त्याठिकाणी दुसऱ्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे आवश्यक राहिल.

३. संस्थेने मोकाट जनावरे कोंडवाडयात टाकल्यानंतर १५ दिवसांच्या मुदतीत जनावरांचे मालक जनावरे सोडविण्यासाठी आल्यास प्रशासकिय ठराव क्र.८ दि.१५/४/२००३ नुसार कार्यवाही करण्याची परवानगी राहिल. तसेच १५ दिवसाच्या मुदतीत जनावरांचे मालक जनावरे सोडविण्यासाठी आले नाही तर म.न.पा. संस्थेकडून विहित नमुन्यात हमीपत्र घेऊन मा.स्थायी समिती ठराव क्र.११ दि.५/७/२००४ नुसार सदरचे जनावरे संस्थेकडे वर्ग करण्यास परवानगी देईल. (**परिशिष्ट अ** विहित नमुना, **परिशिष्ट ब** प्रशासकिय ठराव क्र.८ दि.१५/४/२००३, **परिशिष्ट क** मा. स्थायी समिती ठराव क्र. ११ दि.५/७/२००४ सोबत जोडलेले आहे.)

४. आयुक्तांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यास कोणत्याही वेळेस कोंडवाडयाची पाहणी व तपासणी करता येईल.

**क ) दर व दंड आकारणी**

१ संस्थेने जनावरांना कोडवाडयात टाकलेल्या दिवसापासून १५ दिवसांच्या आंत जनावरांचा मालक जनावरांना सोडविण्यास आल्यास प्रशासकिय ठराव क्र.८ दि.१५/४/२००३ अन्वये मोठया जनावरांसाठी रु.१०००/- दंड व प्रत्येक दिवसासाठी रु.५०/- खावटी, रु.१०/- सोडबांध या प्रमाणे तसेच लहान जनावरांसाठी रु.५००/- दंड व प्रत्येक दिवसासाठी रु.३०/- खावटी रु.१०/- सोडबांध या प्रमाणे जनावरांचा मालकांकडून वसूल करुन पावती देणे आवश्यक राहिल.

२ संस्थेने जनावरे सोडण्यापुर्वी जनावरांच्या मालकाकडून रु.१००/- चे मुद्रांकीत पेपरवर विहित नमुना प्रमाणे प्रतिज्ञापत्र करुनच अट क्र.१ नुसार फी आकारुन व जनावरांच्या मालकाची खात्री करुन मालकाच्या ताब्यात द्यावे लागेल. (**परिशिष्ट ड** सोबत जोडले आहे.)

**ड ) कामगार कायदयाचे पालन**

१. संस्थेने कर्मचारी लावतांना त्यांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षा पेक्षा जास्त नसावे.

२. संस्था ज्या कामगारांची नियुक्त करेल ती नियुक्ती किमान वेतनावर करेल व सदर कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन व नियुक्तीच्या अटी शर्ती त्यास मान्य असल्याबाबतचे संमती पत्र / करारपत्र करुन घेईल, व सदर कर्मचारी महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारच्या हक्क सांगणार नाही, अथवा महानगरपालिके विरुध्द कोणत्याही प्राधीकरणापुढे अथवा न्यायालयात दाद मागणार नाही. असा स्पष्ट उल्लेख संमतीपत्र / करारपत्रात करणे अनिवार्य राहिल.

३. संस्थेने लावलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतनाप्रमाणे वेतन अदा करावे लागेल. सदर वेतनाची अदायगी धनादेशद्वारे करणे संस्थेवर बंधनकारक राहिल, व त्याचा पुरावा सादर करावा लागेल. संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची सेवेच्या बाबतीत, किमान वेतनाच्या व इतर सर्व बाबतीत सर्वस्वी जबाबदारी संस्थेवर राहिल.

**ई ) विमा व नुकसान भरपाई**

१. संस्थेच्या कर्मचा-यास काम करतांना काही दुखापत व अपघात झाल्यास त्याची वैद्यकिय खर्चाची नुकसान भरपाई देणे बाबत तसे कोणत्याही संबंधीत कायदयामधील तरतूदीनुसार अथवा न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीही जबाबदारी निश्चित केल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संस्थेची राहिल. सर्व कामगारांच्या संरक्षणाची जबाबदारी ही संस्थेचीच राहिल.

२. कोंडवाडयामध्ये काम करीत असलेल्या कामगारांचा विमा हा शासकिय विमा निधी कार्यालयाकडेस उतरविणे अनिवार्य आहे.

**फ ) वाद विवाद निर्माण कामी (Dispute Resolution)**

१. संस्थेस सोपविलेले काम असमाधानकारक आहे असे दिसून आल्यावरुन अथवा वाद निर्माण झाल्यास कोणतीही नोटीस न देता निविदा इसारा व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन कोंडवाडा देखभालीचे काम रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांना असेल आणि या बाबत आयुक्तांचा निर्णय अंतिम राहिल.

**ग ) कोंडवाडा देखभालीचा प्रस्ताव रद्द करणे बाबत**

१. वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास कोंडवाडा देखभालीचा प्रस्ताव रद्द करण्याचा अधिकार आयुक्तांना राहिल.

२. प्रचलित नियम / अधिनियमांची विसंगत कृती केल्यास कोंडवाडा देखभालीचा प्रस्ताव रद्द करण्यात येईल.

...१०...

**ह ) न्यायालयीन कार्याक्षेत्र**

१. संस्था व महानगरपालिका मधील कराराबाबत कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास लवाद म्हणून आयुक्त यांचेकडे पुर्ण प्रकरण जाईल व आयुक्त महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम व दोन्ही पक्षांना बंधनकारक असेल. सदरचे लवादास इंडीयन ऑर्बीट्युटर· अँड कन्सीलेशन ॲक्ट १९९६ प्रमाणे पुर्ण अधिकार असेल. व सदर कायदयाप्रमाणे कारवाई होईल.

सदर लवाद फक्त जळगांव शहर हद्दीमध्ये आयोजीत होईल.

**उपायुक्त,**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**उपरोक्त सर्व अटी / शर्ती मान्य असलेबाबत**
**स्वाक्षरी / शिक्का**
**निविदाधारकाचे नांव व पत्ता :-** -----------------------------------------------------------------------

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
## आरोग्य विभाग
## लिफाफा क्रं. २ ( आर्थिक लिफाफा )

**मा. आयुक्त,**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन मी निविदा इसारा रक्कम रु.---------------------
दिनांक : / / २०१४ ने भरलेली आहे.

संस्थेचे नांव व पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------------------

म.न.पा. मालकीचा कोंडवाडा खाजगी नोंदणीकृत गोरक्षण संस्थेस देखभालीसाठी देणे, या कामासाठी म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहे. म.न.पा. कडून कोणताही खर्च आमची संस्था घेणार नाही. तसेच आमचे संस्थेस मिळणाऱ्या रक्कमेतून २० % पेक्षा जास्त रक्कम म.न.पा.स देण्यास तयार आहे.

**संस्थेचा प्रस्ताव :-** ------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

दि. / /२०१४

**निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का**
**नांव व पत्ता, संपर्क पत्ता**

# परिशिष्ट अ

## हमीपत्र

**संस्थेचे नांव :- ----------------------------------------------------------------------------- लिहून देणार**

**मा. आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव :- लिहून घेणार**

१. जनावरांची संख्या ----------

२. जनावरांचे वर्णन -----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

३. कोंडवाडयाकडून संस्थेकडेस जमा झालेल्या जनावरांची नोंदी ठेवणे आवश्यक राहिल.

४. कोंडवाडयाकडून जमा झालेल्या जनावरांची योग्य प्रकारे पालन करण्यास व जनावरे मयत होई पावेतो आमची संस्था जनावरांची चांगल्या प्रकारे देखरेख करण्याची हमी देत आहे.

५. कोंडवाडयाकडून जमा झालेल्या जनावरांवर होणारा खर्च म.न.पा.कडून मागण्याचा हक्क राहणार नाही.

६. कोंडवाडयाकडून जमा झालेले जनावरे जनावरांच्या मालकास ताब्यात देणार नाही.

७. कोंडवाडयाकडून जमा झालेल्या जनावरांची माहिती घेण्यास आयुक्तांनी नेमणूक केलेले म.न.पा. अधिकारी / कर्मचारी केव्हाही गोरक्षण संस्थेत येवून तपासणी करतील. त्यास आमची हरकत नाही.

८. कोंडवाडयाकडून जमा झालेल्या जनावरांची विक्री केल्याचे सिध्द झाल्यास म.न.पा. जी कारवाई करुन निर्णय घेईल तो निर्णय आम्हास मान्य राहिल.

९. कोंडवाडयाकडून संस्थेकडेस जमा झालेले जनावरे मृत झाल्यास त्याचे अधिकृत शव विच्छेदन करुन शव विच्छेदन अहवाल म.न.पा.स कळविणे आम्हाला मान्य आहे.

सही व शिक्का

समक्ष

१ ) ---------------------------------

२ ) ---------------------------------

# परिशिष्ट ब

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

प्रशासकीय ठराव क्रमांक : ८ दिनांक : २५/०४/०३

जळगांव शहरातील म.न.पा.च्या रस्त्यावर तसेच महानगरपालिकेच्या खुल्या भुखंडात अनाधिकृतपणे बांधून ठेवलेल्या जनावरांचा बंदोबस्त होणेचे दृष्टीने मोकाट जनावर मालकांकडून दंड आकारणी करून जनावरे परत करणेबाबतचे आरोग्य अधिकारी यांचे प्रतिवेदन उप-आयुक्त यांचेमार्फत आले ते वाचले.

उक्त प्रस्तावानुसार जळगांव शहरातील रस्त्यावर तसेच महापालिकेच्या खुल्या भुखंडात अनाधिकृतपणे जनावरे बांधून अतिक्रमण करीत असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. तसेच खुल्या भुखंडात बांधून ठेवलेल्या जनावरांचा मलमुत्र, उरलेला चारा अस्तव्यस्त पसरलेले असतात. व त्यामुळे त्याठिकाणी दुर्गंधी निर्माण होवून आजूबाजुचा परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता रस्त्यावरील मोकाट व खुल्या भुखंडात अनधिकृतपणे बांधण्यांत येणा-या जनावरांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे असे माझे मत आहे.

त्यासाठी मी डॉ.संजय मुखर्जी, प्रभारी अधिकारी तथा आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील पत्र क्रं.जीईएन/१५९६/१९४/प्र.क्र.१२६/९६/नवि-२४, दि.२१ मार्च २००३ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५२ अनुसार मला प्राप्त झालेले अधिकारानुसार शहरातील मोकाट जनावरांसाठी प्रत्येक मोठ्या जनावरासाठी रू. १,०००/- व पुढील प्रत्येक दिवसासाठी लागणारा खर्च व लहान जनावरांसाठी रू.५००/- व पुढील प्रत्येक दिवसासाठी लागणारा खर्च याप्रमाणे दंड वसुल करणेत यावा.

त्यानुसार किरकोळ वसुली विभागाने सदर कोंडवाड्यात येणा-या प्रत्येक जनावराची नोंदणी करणे, दंडाची रक्कम वसुल करणे, जनावरे सोडतांना जनावर मालकांकडून रू. २०/- मुद्रांकित कागदावर करारनामा करूनच जनावरे सोडावीत. तसेच जनावर मालकांनी वेळोवेळी दंड भरून त्यांचे जनावरे न नेल्यास त्या जनावराचा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलमाचे तरतुदीनुसार जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याची कार्यवाही करण्याची तजवीज करावी.

सही/-
प्रभारी अधिकारी, तथा आयुक्त
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

सही/-
उप-आयुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव.

पुढील कार्यवाहीसाठी रवाना :-

१) किरकोळ वसुली विभाग,
२) अतिक्रमण निरीक्षक,
३) आरोग्याधिकारी,

जळगांव शहर महानगरपालिका जळगांव, यांचे कडेस..

सही/आयुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव.

HC
[illegible]

.परिशिष्ट क

# जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

## -: स्थायी समिती ठराव :-

सभा क्र. १

विषय क्रमांक ११ ठराव क्रमांक :- ११ दिनांक :- ५/७/२००४.

संदर्भ :-१) श्री.राधेश्याम माधवलाल कोगटा माजी नगरसेवक यांचा दि.५/५/०४ चा अर्ज
२) महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्रं. ८ दि.१५/४/०३
३) आरोग्य अधिकारी यांचे दि.७/५/०४ रोजीचे म.आयुक्त यांचे मार्फत आलेले प्रतिवेदन.

प्रस्तावित केलेप्रमाणे महानगरपालिका कोंडवाड्यातील मोकाट जनावरे सोडविणेबाबत महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्रं.८ दि.१५/४/०३ अन्वये मंजुर झाले आहे. उक्त ठराव क्रं ८ मधील नमुद " तसेच जनावर मालकांनी वेळोवेळी दंड भरून त्यांचे जनावरे न नेल्यास त्या जनावरांचा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलमांचे तरतुदीनुसार जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्याची कार्यवाही करणेंची तजवीज करावी '' अशी तरतुद आहे. जनावर मालकाने दंड भरून जनावरे न नेल्यास ती लिलावात विक्री केल्यास लिलावात विकत घेणारे खरेदीदार हे या जनावरांचा कत्तलीसाठी वापर करतात असा अनुभव आहे.

उक्त ठरावात '' जनावर मालकाने १५ दिवसांत जनावरे सोडवून न नेल्यास ती जनावरे रजीष्टर्ड गो शाळेला विनामुल्य देण्यांत यावीत '' अशी दुरूस्ती करणेंस शिफारस वजा मंजुरी प्रदान करणेंत येत आहे. मान्यतेसाठी महासभेकडेस प्रस्ताव सादर करणेंत यावा.

सर्वानुमते मंजुर

सुचक :- श्री. अनिल अमृत वाणी
अनुमोदक :- श्री मिलींद कोंडू सपकाळे

सभापती,
स्थायी समिती,
जळगांव शहर महानगरपालिका, जळगाव

पुढील कार्यवाहीसाठी :-
१) आरोग्याधिकारी,
जळगांव शहर महानगरपालिका, जळगाव

C:\Documents and Settings\Jay shree Hanumaan\My Documents\My File\New Nivida File.doc

# परिशिष्ट ड

## प्रतिज्ञापत्र

मा. आयुक्त
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव } **लिहून घेणार**

-------------------------------------
------------------------------------- } **लिहून देणार**

खालील सही करणार शपथ पुर्वक प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, महानगरपालिका जळगांव यांच्या मालकीच्या कोठल्याही जागेवर किंवा रोड लगत सार्वजनिक जागेवर जनावरे बांधून अतिक्रमण करणार नाही./ जनावरे सार्वजनिक रस्त्यावर मोकळे सोडणार नाही. यापुढे तसे आढळून आल्यास म.न.पा. जो निर्णय घेईल तो मला मान्य राहील.

**सही**

**समक्ष**

१ )

२ )